**प्राथमिक शिक्षकांना २४ वर्षाच्या सेवेनंतर निवडश्रेणी लागू करणे व उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक :-पीआरई-२००८/(२०७/०८)/प्राशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १८ जून, २००८.

संदर्भ:-
१ शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र:चवेआ-१०८९/१११/माशि-२, दि.२ सप्टेंबर, १९८९.
२ शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई-२००२/ ३३०२/ प्राशि-१, दि.२० जुलै, २००४.
३ शासन शुध्दिपत्रक शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई-२००२/ ३३०२/ प्राशि-१, दि.१५ नोव्हेंबर, २००६.

**शासन परिपत्रक:-** राज्यातील मान्यताप्राप्त प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांना व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमधील शिक्षकांना दि.१-१-१९८६ पासून चौथ्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्यानुसार वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी पात्र होण्याकरीता काही अटी व शर्ती विहीत करण्यात आल्या आहेत. तसेच त्या त्या संस्थेतील व संवर्गातील वरिष्ठ श्रेणीतील २०% पदांना सेवा जेष्ठतेनुसार निवडश्रेणी अनुज्ञेय करण्यात आली आहे परंतु उच्चश्रेणी प्राप्त करण्यासाठी संबंधीत शिक्षकांनी शैक्षणिक अर्हता वाढविणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे ज्या शिक्षकांनी दि.१-१-१९८६ रोजी १८ वर्षे सेवा पूर्ण केली असेल अशा शिक्षकांना शैक्षणिक अर्हता वाढविण्यापासून सूट देण्यात आली आहे. या संदर्भात क्षेत्रीय अधिका-यांमध्ये संभ्रमता निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. ही संभ्रमता दूर करण्यासाठी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरणात्मक सूचना देण्यात येत आहेत:-

१ चौथ्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार त्रिस्तरीय वेतनश्रेणी दि.१-१-१९८६ पासून लागू करण्यात आली आहे. त्यामुळे ज्या प्राथमिक शिक्षकांची दि.१-१-१९८६ पर्यंतची सलग

अर्हताकारी सेवा १८ वर्षाची किंवा त्यापेक्षा जास्त झाली असेल केवळ अशाच प्राथमिक शिक्षकांना निवडश्रेणीसाठी विहित केलेली उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त करण्याच्या अटीपासून सूट देण्यात आली आहे.

२ ज्या प्राथमिक शिक्षकांची दि.१-१-१९८६ पर्यंतची सलग अर्हताकारी सेवा १८ वर्षापेक्षा कमी झालेली आहे अशा शिक्षकांना वरील सूट देय नाही. निवडश्रेणीसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता त्यांनी प्राप्त करणे आवश्यक आहे. अन्यथा ते निवडश्रेणीसाठी पात्र समजले जाणार नाहीत.

३ ज्या प्राथमिक शिक्षकांना किमान १८ वर्षे किंवा अधिक सलग अर्हताकारी सेवा झाल्यामुळे उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त करण्याच्या अटीपासून सूट मिळालेली आहे अशा प्राथमिक शिक्षकांची ज्या वर्षी २४ वर्षाची सलग अर्हताकारी सेवा पूर्ण होईल अशा शिक्षकांना, त्या वर्षापासून, निवड श्रेणीसाठी विहित केलेल्या अन्य अटी व शर्तीची पूर्तता होत असल्यास निवडश्रेणी देय ठरेल. दि.१-१-१९८६ रोजी सेवेची सलग १८ वर्षे अर्हताकारी सेवा झाल्यामुळे त्यांना वरिष्ठ श्रेणी दिल्यानंतर इतर अटी व शर्तीची पूर्तता होते म्हणून त्या पुढील १२ वर्षानी म्हणजेच सेवेची ३० वर्षे सलग अर्हताकारी सेवा झाल्यानंतर निवडश्रेणी देय करु नये.

४ वरिष्ठ श्रेणी किंवा निवड श्रेणीसाठी ज्या शैक्षणिक अर्हता विहित केल्या आहेत ती शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या दिनांकापासूनची सेवा अर्हताकारी सेवा म्हणून विचारात घेण्यात याव्यात. याकरीता अन्य अटी व शर्ती विहित केल्या असल्यास त्यांचाही विचार करण्यात यावा.

हे परिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००८०६१८१५१६४३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु. ह.उमराणीकर )

कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रति,

शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे.

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे.

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.

सर्व शिक्षणाधिकारी, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रशासन अधिकारी, शिक्षणाधिकारी, महानगरपालिका शिक्षण मंडळे

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

निवड नस्ती, (प्राशि-१)